# प्रकरण तिसरे -

# 'मला उद्ध्वस्त व्हायचंय'-

# स्त्रीवादी दृष्टीने अभ्यास

## प्रकरण तिसरे

### " मला उद्ध्वस्त व्हायचयं " स्त्रीवादी दृष्टीने अभ्यास :

१९ व्या शतकाच्या उत्तरार्धात महाराष्ट्रात म. फुले आणि सावित्रीबाई फुले यांच्या स्मानें अत्यंत प्रभावीपणे आणि प्रखरपणे स्त्री विमोचनाच्या कार्याला प्रारंभ झाला. हिंदू समाजाने धर्मग्रंथाचा आश्रय घेऊन स्त्रीची जी अवहेलना चालवली त्यावर फुल्यांनी आघात केले. स्त्रीला विचारप्रवृत्त करण्यासाठी तिला शिक्षण दिले त्यामुळे महाराष्ट्रातील मराठी स्त्री शिक्षित झाली. विचार प्रवृत्त झाली. आणि संघर्षोन्मुख झाली. या बदललेल्या स्त्री जीवनाचा अविष्कार मराठीत वेगवेगळ्या साहित्यात होऊ लागला. मराठी वाङ:मयाच्या विविध प्रकारात विपुल लेखन करण्यात आजही मराठी स्त्री मागे नाही. कथा, कादंब-या नाटक, कविता या बरोबर आत्म कथन, आत्मचरित्र याही प्रांतात आज हिरीरीने स्त्रीया पुढे येत आहे. या आजच्या मराठी स्त्रीला कांहीतरी स्वत:बद्दल सांगायचे आहे. म्हणून आत्मकथन. याव्दारे त्यांनी आपलं सामर्थ्, आपलं घुसमटलेल्या मनाचा हलकेपणा कमी करण्याचा प्रयत्न केला. अशाच प्रकारचा प्रयत्न " मला उद्ध्वस्त व्हायचं " मधून मलिका अमरशेख यांनी केला आहे.

" मला उद्ध्वस्त व्हायचयं " हे मलिका अमरशेख याचे आत्मकथन म्हणजे एका स्त्री जीवनाचे उद्ध्वस्तीकरण आहे. त्यांनी जे जीवन जगलं, पाहीलं, भोगले, सोसले, त्याचा हुंकार म्हणजे हे आत्मकथन होय. एका कम्युनिष्ठ कार्यकर्त्यांची ही मुलगी आणि आजही गाजत असणारा कवी नामदेव ढसाळ यांची ही पत्नी इतक्या प्रतिष्ठीत व्यक्तीच्या सहवासात असणा-या मलिका अमरशेख यांना आपलं जीवन उद्ध्वस्त करावं असं का वाटावं ? हा एक महत्वाचा प्रश्न आहे. हा प्रश्न केवळ मलिकापूरता नाही तर तो संपूर्ण स्त्री संदर्भातला आहे. म्हणून तिचे अनुभव तिचे जीवन, तिची दाहकता याचा

व्यापक अशा स्त्रीवादी दृष्टीकोनातून विचार करावा लागतो.

सुरवाती पासूनच गायन, नृत्य, नाटक, कविता यात रमणारी लेखिका, स्त्री स्वभावधर्मा प्रमाणें आपल्या स्वत:च्या कुटुंबा विषयी भावी आयुष्याची स्वप्ने रंगविण्यात गर्क होती. तिचे म्हणून एक स्वप्न होते. त्यामुळे ती म्हणते, " स्त्रीत्वाची जाणीव झाली न मी फुलायला लागले... लाजायला लागले.... आरशात बघु लागले. साडी मला चांगली दिसायची. तारुण्य अंगावर उमटलेले, डोळ्यात स्वप्नं... हळवी, तरल... मला लहान-पणापासूनच एक खोड. प्लॅनिंग करायचं प्रत्येक ग ोष्टीचं पुस्तकातही चांगली वाक्यं... शेरो शायरी... पाहिलेले चित्रपट... सौंदर्य प्रसाधन, साडया, मेकप, बंगला कसा असावा... पियानो कुठल्या बाजूला... बंगला.... काचेचे दरवाजे.... विस्तीर्ण .... खूप प्रकाश.... मोकळी , प्रसन्न हवा... लायब्ररी.... समोरं छोटंस तळं... मासे.... लालपिवळे सुळसुळते... खिड-कीतनं दिसणारा बकुळ- गुलमोहर ... रातराणीची झाडं... मागं गर्द रान... लालसर पायवाट... "[१] हे तिचे स्वप्न आहे. अशा स्वप्नाळू वृत्ती बरोबरच कविता करण्याचा छंदात ती नेहमी मग्न असते. त्यात घरी कम्युनिष्ठ विचार सरणीचे वातावरण असल्याने अनेक कार्यकर्त्यांची ये-जा सतत असायचीच. त्यात नव्याने निर्माण झालेल्या " दलित पँथर " या राजकिय संघटनेचा त्यांच्या घराशी अगदी जवळचा संबंध आल्याने त्यातील कार्यकत्यांचेही येण्जाणं सुरु झाले त्यातूनच नामदेव ढसाळशी त्यांची ओळख झाली. सुरवातील एक कवी आणि पँथरचा धडाडीचा कार्यकर्ता एवढीच त्याची ओळख, पण नंतर वारंवार मलिकाच्या घरी त्याचे येणं असल्याने तिला त्याच्या बद्दल एक वेगळीच ओढ निर्माण झाली. त्याच्याबद्दल असणा-या या आंतरिक ओढीतून, आकर्षणातून तिचे त्याच्याबरोबर हिंडणं फिरणं पत्रव्यवहार हा वाढत गेला. त्याच्या या सहवासाने " आयुष्य हिशेब न ठेवता

बेभानपणे फेकून द्यावं – धुंदपणे जगावं हे तिचे जीवनाचे तत्वज्ञान साकारत होते. येथे तिची स्त्री सुलभ प्रेमभावना व्यक्त झालेली पहावयास मिळते. अनेकदा त्याच्याबरोबर कधी गोल पिठयाची वस्ती, कधी समुद्र किनारा फिर-ताना प्रेमाचा मुक्तपणे आस्वाद ती घेत होती. त्यामुळे प्रेमाबरोबर एका नव्या जगाची जाणीवही होत होती. जगण्यातील एक विलक्षण आनंद ती उपभोगत होती. नामदेवचं धडाडीपणे, त्याचे चालवलेली पँथरची कामे, पुढारीपण, प्रसिध्दीचा ओघ, समाजातील प्रतिष्ठा, क्रांतीकारक यामुळे तिने त्याच्याशी लग्न करण्याचे ठरविले. सुरवातीला घरी विरोध होता प्रेम आणि लग्नाचा घेतलेला निर्णय यामुळे त्यांच्या लग्नाला होकार मिळाला. दोघांनीही समजून उमजून लग्न केले. बेधुंद बेफिकीरपणे जीवनाचा आस्वाद घेणारी लेखिका एका वेगळ्या जगात आली " कुंटुब " या नव्या विश्वात ती आली. सहवासाचा अनुभव ती घेवू लागली. सर्व सामान्य कुंटुंबाप्रमाणे त्यांचंही एक कुटूंब साकारलं. संसाराच्या नवा अनुभवामुळे आजपर्यंत घरी कपबशी न उचलणारी मलिका आता मात्र घरकामाची सगळी सवय करून घेऊ लागली. कौटुंबिक जबाबदारी पेलणारी, परिपूर्ण स्त्रीची भूमिका ती पार पाडत होती. नामदेवचे मात्र हिंडणे – फिरणे, मिटींगा, सभा, कार्यक्रम आणि पँथरची कामे ही सुरूच होती. त्यात तो पूर्णवेळ गुंतलेला होता. त्याच्या या कामात प्रसंगी मलिका मदत करीत होती. त्यात ओढली जात होती. ब-याच वेळा मिटींगा, सभा यांना तिला हजर रहावे लागत होते. सुरवा-तीला ती हे एका वेगळ्या खुशीने करत होती. त्यातच मातृत्वाच्या सुखद अनुभवाची चाहूल तिला लागली. दिवसेंदिवस तिच्या जगण्यात एक नवा गुलमोहर फुलत होता. पण नामदेवचे बेफिकिरपणे रहाणे घराकडे, दुर्लक्ष पत्नीकडे दर्लक्ष, होत होते यामुळे मल्लिकाला जीवन एकाकी वाटू लागले. कुठे तरी खचल्याची जा णीव होवू लागली त्यामुळे त्या दोघांत वादावाद होत असे पण रूसणे, फुगणे, पुन्हा नामदेवचे समजावणी यामुळे घसरणारी

संसाराची गाडी रूळावर येत होती. मुळातच मलिका अमर शेखनी कलासक्त वृत्तीची आणि स्वतंत्रपणे जगण्याची इच्छा बाळगणारी स्त्री, कर्तबगार, चळवळीची पार्श्वभूमी तिच्या जगण्याला आहे. अशी विशिष्ठ जिवनाच्या तत्वज्ञानाचा स्विकार केलेली, जगण्याची पूर्ण समता असलेली आणि तरीही तिची ही क्षमता खुरटते याचे कारण म्हणजे कौटुंबिक जीवनातील कटु अनुभव. त्-यात नामदेवच्या ठिकाणची पुरुषी प्रवृत्ती यामुळे ती क्षणाक्षणाला उदध्वस्त होत होती. यामुळे तिचे मानसिक खच्चीकरणही होत होते. याबद्दल सांगतांना ती म्हणते - " नामदेवच्या व माझ्या भांडणात विलक्षण टेन्शन यायचं मला, कांही तरी टोकाचं बोलण झालं, की डोक्यात झणकन वाजायचं... ब्लॅक... मेंदूच नाही असं वाटायचं आणि मी मग आत्महत्याचा प्रयत्न करायचे, अनेक वेळा जीव नकोसा होणं ही गोष्ट एका टोकाची प्रक्रिया, प्रतिक्रिया त्याचं समर्थन देणं कबूली देणं, नाकारणं - सगळच विलक्षण अवघड आहे. मात्र एक गोष्ट अतिशय खरी आहे. ती सांगायला हवी, की त्या तीव्र संतापाच्या दुख:च्या भावना वेगातही जगावं, असंच वाटायचं. "[2] असे असून देखील ती जगण्याची आस बाळगून होती. पण लेखिका आपल्या आयुष्याचा अंत करण्याचे ठरविते.

नामदेवची वाढती पिण्याची सवय अफाट खर्च बेशिस्त, बेफिकीर न् शिवराळ वागण्याचा, कार्य कर्त्यांना सतत घरात जेवण घालण्याचा आणि त्याचं रात्री, अपरात्री घरी येण्यानं ती वैतागून गेली. एका स्वतंत्र विचाराच्या मलिकेला पुरूषी वर्चस्वाखाली खुरटणे असह्य झाले. त्यामुळे त्यांच्यात तणाव हा वाढतच गेला. संसारात पडून सुध्दा संसारी न बनलेल्या नामदेवमुळे लेखिकेचे जीवन उद्ध्वस्त झाले त्यांच्यातील तणाव इतक्या टोकाला गेला की त्या दोघातील अंतर दुरावत चालले आणि त्याची खंतही त्या व्यक्त करतात -.... पिणं, भांडणे, शिव्यागाळ, मारहाण, पण त्या सगळ्या दु:खाहून प्रचंड दु:ख होतं, की माझा पूर्वीचा नामदेव हरवून बसले. तो बदलत चालला होता.

माझ्यापासून दुरावत होता आणि मी कांहीही करू शकत नव्हते. मला त्याच्या सहवासाची, त्याच्या प्रेमाची ओढ होती. पण त्याला माझी गरज वाटत नव्हती या जाणिवेनं, या कटू सत्यानं, सत्यानं मी हादरून गेले होते. कोडमडून पडले होते."[3] हे कोडमडणं एका मलिका अमरशेखचं नाही तर ते एका स्त्री जातीचं आहे. कारण प्रत्येक स्त्रीचं तिचं म्हणून एक स्वप्न असते. आपला संसार, आपली मुलं व पती याचं एक वेगळं जग असतं आणि त्या जगात ती सुखी होऊ पहाते. पण तिच्या जीवनाचच उद्ध्वस्तीकरण होत असेल तर ते ती कशी खपवून घेणार ? आणि नेमके हेच या ठिकाणी होत गेले. नामदेवचं घराकडे मुलाकडे होत असलेले दुर्लक्ष यामुळे तिला त्याचे वर्तन नेहमी त्रास दायक वाटू लागले. ज्या उमेदीने तिने त्याच्याशी विवाह केला ती उमेदच हरवल्याची खंत तीच्या ठायी येऊ लागली. त्यातच तिच्या पतीचा इतर स्त्रीयांशी असलेला संबंध यामुळेही ती हवालदिल झाली. स्त्रीच्या दु:खाचे अनेक पदर याची प्रचिती या ठिकाणी येते, प्रितिच्या असफलतेचे जसे दु:ख असते तसेच ... हरवले ते गवसत नाही याचेही दु:ख असते. तसेच नवरा कामात व्यग्र असणे याचे जसे दु:ख असते तसेच तो लंपट असने याचेही दु:ख असते. आपल्या भावनेचा कुठेच विचार होत नाही याचेही फार मोठे दु:ख असते. या सर्व दु:खाचा अनुभव घेत मलिका जगत होती. तिचे जगणे हे नामदेवमुळे नाही तर या व्यवस्थेमुळे निर्माण झाले आहे. कारण या व्यवस्थेत स्त्रीला स्थानच नाही, स्त्री ही पायदळी तुडवली जाणारी वस्तु आहे अशा व्यवस्थेत तिच्या मनाचा, भावनेचा तरी कोण विचार करणार ? मग नामदेवचे हे वागणे त्याला अपवाद का ठरावे ? तोही या व्यवस्थेतील एक प्रतिकच. नामदेवच्या अशा बेफिकीर वागण्याने ती पूर्ण खचून गेली होती. त्यामुळे –" कांहीतरी आपल्या हातून निसटून चाललंय व ते धरण्याचा अटोकाट प्रयत्न... डोळ्याभोवती काळी वर्तुळं... विलक्षण अस्वस्थ, रडवेली... ओ, गॉड ! .... किती तरी भयानक असहायता... डोकं जड ... गच्च... नसा तटाडून उभारलेल्या... एक लांबच लांब पोकळी उदासिनतेची, एकाकी-पणाची ..."[४] अशा एकाकीपणाची चाहूल तिला अस्वस्थ करत होती. तरी स्त्री स्वभाव धर्माप्रमाणें प्रत्येक चूक ती पोटात घेत होती. पण पुरूषी संस्कृतीचा ठेंबा मिरवणारा प्रतिनिधी नामदेवची कृती ही अमानवी अशी होती. त्याच्यामुळे

केवळ माणसीक नाहीतर शारीरिक छळालाही तिला तोंड द्यावे लागत होते. म्हणून ती म्हणते, -" एकदा जेवण न केल्यावरून असंच भांडण झालं–न् तो भर रात्री आठ महिन्यांच्या आशूला घेऊन घरातून निघून गेला ! ... मारलेल्या थपडीनं नाकातनं आलेलं रक्त पुसत मी बिछान्यावर पडले होते... जवळच्या माणसांनी माझ्या जवळी येऊ नये, असं वाटतं होतं... शरीरानं, मनानं, आयुष्यानं मी उद्‌ध्वस्त झाल्येने तो एक एक क्षणी मी मरण अनुभवत होते. एका कुठल्या तरी क्षणी रूजलेला त्याचा अंश एवढाच त्याचा संबंध न् तरीही तो आशूला जबरदस्तीनं माझ्या कुशीतून ओढून घेऊन गेला, नऊ महिने वागवलेलं ओझं, त्या मरणांतिक कळा – न् तरीही माझा अधिकार नाही ? का म्हणून ? विचार करण्याची शक्ति थकली... बधिर झालेली... ती रात्र गिरमिट फिरविल्या-सारखी तीक्ष्णपणे मनात घुसत चालेली... डोळे सुजलेले... मी आयुष्याच्या या वळणावर पाहू शकत नाही, थांबू शकत नाही, आणि असं म्हणताना मी डोळे मिटू शकत नाही. रस्ता थांबलेला... काळ थांबलेला... रात्रं थांबलेली..."[5] अशा थांबलेल्या रात्रीत ती आशेचा किरण पहात होती. परंतु मागमूसही न लागल्याने शेवटी तिने त्याचे घर सोडले. लहानशा आशूला देखील तिने हृदयावर दगड ठेवून सोडून गेली. अर्थात एका आईचं मन मात्र त्या ठिकाणी कळवळत होतचं, पण तरीही नामदेवच्या जाचाला कंटाळून ती निघून गेली. आता ती आपल्या अस्तित्वाचा, स्वत्वाचा शोध घेऊ पहात होती आणि या व्यवस्थेचे अलिप्तपणे केलेल्या निरिक्षणात तिला आपल्या माणूस पणाचा कुठे विचारच केलेला नाही, याची जाणीव झाली. म्हणून ती यातून मुक्त होऊ पहाते. अनेक यातना सहन करूनही आपल्याकडे माणूस म्हणून पाहिले जात नाही ही जी आजच्या स्त्रीची खंत आहे तीच या ठिकाणी मलिकाची आहे. एक स्त्री म्हणून जे दु:ख भोगत आहे ते अनेक पातळीवरचे आहे. सुरूवातीला प्रेयसी नंतर पत्नी व शेवटी माता म्हणूनही तिला फरपटावे लागते. स्त्रीला माता, देवता, सहचारिणी, सखी असे संबोधले जाते. त्याची प्रत्यक्ष प्रचिती कुठेच जाणवत नाही. केवळ अशा शब्दाच्या माध्यमातून स्त्रीला एका उच्च टोकाला नेऊन बसविले आहे, पण प्रत्यक्ष व्यवहारात मात्र ती एक उपभोग्य वस्तूच आहे हेच स्पष्ट दिसून येते. यातूनच तिला मुक्त

व्हायचं आहे. ही मुक्तता व्यक्त करतांना आजपर्यंत झालेला गुदमरा, सोसलेला त्रास याचा ती एकदम स्फोट करतांना म्हणते, " आता नामदेव बद्दल काय वाटणार होतं ? एक अख्ख पिस्तूल रिकाम करावं त्याच्या छातीवर - नखांनी ओरबाडावं... त्याला काय अधिकार होता. माझ्या आयुष्याशी खेळण्याचा ? मी जिवापाड प्रेम केलं हा गुन्हा ? " [6] मलिकानं विचारलेला हा प्रश्न आजच्या स्त्रीवादी दृष्टीने अत्यंत महत्वाचा आहे. आजपर्यंत स्त्री ही एक उपभोग्य वस्तू हा जो एक रूढ अर्थाने आलेला विचार या विचारालाच या ठिकाणी छेद दिला आहे. आपणही माणूस आहोत आपले मन, इच्छा, व शरीर यावर कुणाचाही अधिकार नाही. मग तो आपला पती जरी असला तरीही नाही. तिच्या ठिकाणी स्वातंत्र्याची आस आणि स्वत्वाची जाणीव झाल्याने ती एक स्वतंत्र व्यक्ती म्हणूनच जगू इच्छिते. या जगण्यात येणा-या प्रत्येक संकटाला तोंड देत ती मुक्तीच्या दिशेने जाताना आपल्याला पहायला मिळते. ज्याच्यामुळे आपल्या जीवनात संकटे आली त्यालाच आता नकार देण्याचा ती मानसिक तयारी करते. इतकेच नाही तर ती म्हणते - " माझ्या अवघ्या अस्तित्वाच्या उद्ध्वस्तपणाला कारणीभूत झालेल्या माणसाचा अंश मी कुठल्याही किंमतीवर माझ्या रक्तात रूजवून घ्यायला तयार नव्हते. माझ्या रक्तानं ते नामंजूर केलेलं. "[7] माणसाचा संयम एक विशिष्ट टोकाला गेला की तो आवरता येत नाही. आणि नेमकी हीच परिस्थिती या ठिकाणी जाणवते. एकेकाळी नामदेववर जीवापाड प्रेम करणारी मलिका आज त्याचा हा तिरस्कार करते. हा मानवी सहनशीलतेच्या टोकाचा व स्त्री मनाच्या गुदमरतेतून, घुसमटलेपणातून आलेला स्फोट आहे. यातून तिच्या जीवनाची दाहकता तर जाणवतेच पण हे जीवन, हे वास्तव हे एक आव्हान आहे आणि ते ती स्वीकारून त्याला तोंड देत आहे. त्यातूनच ती आपले अस्तीत्व टिकावू पहाते हे दिसून येते म्हणून ती म्हणते, -" तीन चार वेळा अॅबार्शन करून शरीर चिपाडागत झालेलं... फक्त तेवढे धाव पडत होते, तेवढयाच दुप्पट ताकदीनं, मी ते झेलत होते. मन चिवट, कणखर झालेलं... मी बदलत चालले होते अंतर्बाहय ... कुणाची पत्रास न ठेवता बोलू लागले- भांडू लागले. शेवटी सुखी व्हायचं असेल, मुळमुळ रडत बसून चालणारच नाही. सुख हवं ? हिसकावून घ्या. स्वातंत्र्य हवं ? ओरबाडून-खेचून घ्या. आयुष्यानं मला

हा दुर्मीळ, न विसरता येणारा धडा शिकवला. आता आयुष्य हा माझ्या दृष्टीनं एक चॅलेंजिंग एक गेम होता... मी आव्हान स्वीकारलं होतं... सगळ्यांचंच ... एका पुरूषाचं... परिस्थितीचं..."[८] आणि हे चॅलेंज ती स्विकारत होती. त्यातून जगू पहात होती. ह्यातूनच एक सत्य तिनं पाहिलं होत ती म्हणते - " सत्य काय होतं ? माझ्या भोवतीचा विषम, विस्कळीत समाज ? बलात्कारीत आणि नव-याचे जुलूम सहन करत संसाराची ठिगळ लपवणा-या बळी चाललेल्या स्त्रिया ? राजकारण्याची गलिच्छ बाजारपेठ ? क्रांती-बंड-विद्रोहाच्या नांवाखाली विकत जाणारे स्वस्त पुढारी...? कलेच्या नावानं पोट भरणारे न् अर्धपोटी दुर्लक्षित कलावंत, की या सगळ्यांतून वेगळी पडलेली मी ? माझं अपुरं, दुर्लक्षित अस्तित्व ? माझं वैयक्तिक दु:ख... ही कोंडी ... मी माझ्यासाठी काय करू शकते ? न् या सर्वांसाठी काय करू शकते ?"[९] एका सत्यातून मीची आणि स्त्रीची झालेली ओळख हे आजच्या स्त्रीवादाचे एक वैशिष्ट्य म्हणजेच स्वत:च्या कष्टदायी आयुष्याचे आणि भोवतालच्या जगाचे स्त्रीने केलेले निरीक्षण याचा प्रत्यय त्यांच्या या प्रसंगातून जाणवतो. एका संवेदनशील स्त्रीच्या जीवनाच्या कहानी बरोबर तिच्या विचार क्षमतेचेही दर्शन घडल्यावाचून रहात नाही. स्त्री ही अबला आहे. दुबळी आहे हे तीने खोडून काढले आहे. म्हणून ती पुढे लिहिते- " केवळ एका पुरूषाला समर्पित होण्यासाठी माझं आयुष्य का असावं ? मी एक स्त्री... एक आदिम शक्ती... या सर्वभर पसरलेल्या चैतन्यदायी निसर्गाचं मी एक प्रतीक..."[१०] हे उद्‌गार समस्त स्त्री जातीचे आहेत की जीचे स्वत्व, स्वाभीमान जागृत झाला आहे. अस्तित्वभान आले आहे. प्रत्येक स्त्रीचा हा आवाज आहे. ती एका स्वातंत्र्यासाठी धडपडत आहे हेच यातून स्पष्ट होते.

स्त्री ही कितीही कर्तबगार असली तरी तिच्या कर्तबगारीचा विचार आजवर झालाच नाही. केवळ ती एका पुरूषाची बायको, मुलगी, आई इत्यादी नाती सोडून तिला शुल्लकच समजले. नव-याशिवाय स्त्रीला अस्तित्व असते हे कुणी गृहीत धरलेच नव्हते. समाजातील मंडळी कितीही पुढारलेली असली तरी त्याचा विचार अजून तरी पुढारलेला आहे काय ? हा प्रश्न विचार करायला लावतो. आणि त्याचा प्रत्ययही या आत्मकथनातून जाणवतो. विचार आणि प्रत्यक्ष व्यवहार यात किती तफावत असते हे सांगताना ती म्हणते- "कलात्मक चित्रपटात

बायकांवरचे मानसिक - शारीरिक बलात्कार व चाललेली फरफट पाहून सगळे पुरूष चुकचुकतात. पण कळत न कळत पणे तेही हेच करत नसतात काय ?"[११] हा प्रश्न तिच्या अनुभवातून, जगण्या भोगण्यातून आल्याने तीची सारी चिड पुरूष-प्रधान संस्कृतीवर व्यक्त होताना दिसते. म्हणूनच ती पुरुष प्रधान संस्कृती विषयी लिहीते - " मुळात पुरूष या प्राण्याला जातच नसते. संस्कृती हा प्रकार तर अजिबात नसतो. स्त्रीकडे आहे, असा दावा मी करत नाही. 'भारतीय संस्कृती' हा एक हास्यास्पद असा मेलेला प्राणी आहे, असं माझं ठाम मत आहे. प्रत्येकजण आपापल्या फायद्यासाठी हवा तो चामडयाचा तुकडा पळवून अंगावर घालून हिंडतोय.... पण हया पातळ आवरणाखाली एक घट्ट चिखल - एक नागडं सत्य... माणसाचा आदिम हिंस्त्र चेहरा खराखुरा ... कुत्र्याबरोबर झटापट करून उकिरडयातली भाकरी पळवणारा एक मानव आणि हेच दृष्य अत्यंत निर्विकारण पाहून, वाट वाकडी करून गाडी धरणारा मानव... कुठल्याही दु:खाची सवय होणं हे त्या समाजाचं संस्कृतिनिदर्शक चिन्ह नाहीच मुळी"[१२] असे पुरुषी वर्चस्वाला धिक्कारते तसे या संस्कृतीलाही. कारण संस्कृतीच्या, सभ्यतेच्या गोंडस नावाखाली स्त्री पुरूषात केलेले भेद आणि स्वार्थापोटी स्त्रियावर लादलेली बंधणे तिला मान्य नाहीत. त्यातुनच ती मुक्त होऊ पाहते. एकूणच हे आत्मकथन म्हणजे एका स्त्रीमनाचा गुदमरा आहे. जे आजवर भोगले, सोसले त्याचे हे चित्र विशेष करून प्रतिष्ठित म्हणवल्या जाणाऱ्या पुरूषांच्याकडून स्त्रियांची होणारी कुचंबना यांचे हे दाहक दर्शन आहे. एक मोठया वृक्षाखाली लहानसं रोपटं खुरटावं तसं या व्यवस्थेतील स्त्रीच जगणं आहे. ते संपूर्ण भारतीय समाजातील स्त्रीचं जगणं आहे.

वरवर पहाता या आत्मकथनात आपणास असे दिसते की मलिका अमरशेख आणि नामदेव ढसाळ यांच्या कौटुंबिक झगडयातील संघर्षमय कथानक आहे. पण केवळ ते तसे नाही. केवळ नवरा बायकोचे भांडण एवढाच त्याला अर्थ लावता येत नाही. हे आत्मकथन समस्त स्त्री जीवनाचे चित्रण आहे. तिला आजच्या समाजात भोगाव्या लागणाऱ्या व्यथा वेदनांचा तो स्फोट आहे. तसेच सामाजिक बदलाचा तिच्या जीवनावर होणारा परिणाम, तिला करावा लागणारा संघर्ष, तिला पत्करावे लागणारे पुरूषाचे दास्यत्व, तिची होणारी कुचंबना, उपेक्षा, अवहेलना,

तिच्या दडपल्या गेलेल्या भावना, तिची अगतिकता, तिचे आर्थिक परावलंबीत्व त्यामुळे तिच्या वाट्याला आलेली गुलामगिरी, सामाजिक परंपरा जोपासण्यासाठी तिच्यावर लादली गेलेली बंधने, त्यातून तिची होणारी घुसमट, दडपल्या जाणाऱ्या इच्छा, आशा आकांक्षा वेगवेगळ्या मार्गाने व्यक्त होतांना दिसतात. असा एक भावनानुभव सांगताना मलिका म्हणतात- " नामदेव निघुन जायचा... कुव्हा केव्हा तो आदी लाडात आलेला असायचा .... अर्धवट रंगात आलेला प्रणय .... न् दारावर थाप .... नवरा रात्री शेजारुन उठून निघून जाणं हा प्रकार फार यातनादायी असतो. मी धुसफुसायचे ... झोप तर यायची नाहिच. एक... दोन... तीन.... चार.... पाच.... नळाचा आवाज.... कोंबडयाची बांग .... अर्धवट जाग.... अर्धवट गुंगी.... न् बेसूर वातावरण .... असुरक्षितपणा ... एकटेपणा... उफ... तेंव्हा ते वाट बघणं.... टूक्सीचा आवाज दुरुनही मला येत आहे... मी तटकन् उठायचे न दार उघडायचे.... मग रुसवा ... किटकिट ... अबोला ... समजावणी ... कधीकधी भांडण टोकाचं... कार्यकर्त्यांना शिव्या... पण रात्रीचा मला झालेला मनस्ताप त्याला समजणं, जाणवणं शक्यच नव्हतं."[१३] यातून स्त्रीला केवळ भोगवस्तू म्हणून न पहाता स्त्रीलाही भावना असतात, तिही माणूस असते, स्त्रीच्याही इच्छा आकांक्षा असतात याचा विसर या पुरुषप्रधानतेला पडलेला असल्याने किंबहुना त्या म्हणतात त्या प्रमाणे जाणवत नसल्याने हे दु:ख ही ती या ठिकाणी मांडत आहे. त्यातून एकूणच भारतीय समाज व्यवस्थेत स्त्रीचे स्थान तिच्याकडे पाहण्याची वृत्ती याचाही उल्लेख केला आहे. -"वैयक्तीक पातळीवरचे अनुभव फारसे भावत नाहीत. व्यापक विचार ... न् सामाजीक प्रश्न ... किंवा असा एखादा अनुभव किंवा विषय, की जो कुणाच्याही बाबतीत कुठंही, कधीही घडू शकतो... न् जे उत्कट, दाहक आहे, अशाच लेखनाला उचलून धरलं जांत... आणि म्हणूनच स्त्रीचं साहित्य हे विश्वात्मक पातळीवरचं काय, आपल्या इथल्या सामाजिक पातळीवरचं साहित्य म्हणूनही धरलं जात नाही ..."[१४] यांचं कारणं सांगताना त्या पूढे म्हणतात - "एखाद्या बाईवरला बलात्कार म्हणजे पेपरवाल्या न् राजकारणी लोकांना पर्वणीच. हरघडी होणारे तिच्यावरले मानसिक बलात्कार ? जिथं शारिरीक बलात्काराचांही राजकीय भांडवल केलं जातं, तिथं मानसिक बलात्कारांना कोण विचारतंय ?"[१५] ही जी स्त्रीची होणारी अवहेलना एकूणच या संस्कृतीचे एक दाहक दर्शन आहे. कारण ज्या स्त्रीला देवतेचे स्थान होते त्याच स्त्रीचा असा छळवाद व्हावा जीच्याकडे जगदउध्दारी म्हणून पाहिले जाते. त्याच स्त्रीचे आज लोक

भांडवल करताना दिसतात. आणि म्हणूनच या सर्वातून स्त्री मुक्त झाली पाहीजे म्हणून त्या म्हणतात -" नव-याची सावली म्हणून अखेरपर्यंत सगळ निमूट सोसायचं न त्याग न मोठे पणाची बीरुदं चिकटेपर्यंत मरायचं, हे दिवस जावोत लवकर... या देशातल्या स्त्रीमधल्या सर्वांगिण सहनशक्तीचा लवकरात लवकर मृत्यु होवो..."[१६] ही एक प्रामाणिक स्त्रीची इच्छा म्हणजे या संस्कृतीतून या छळवादातून सूटका होण्यासाठी निघालेला एक निश्वास आहे. असा हा नि:श्वास आहे. तसाच त्यांनी या पुरुष प्रधानतेवर इशाराही दिला आहे. - " सगळं खूप आतल्या कप्प्यापर्यंत आणलंय मी .... खोलवर .... वेदना माणसाला निर्लज्ज करते. नग्न चेहरा दिसतो. वेदना - भूकेची - संतापाची - दु:खाची. हिंस्त्रपण प्रत्येकात असतंच लपलेलं ... माझ्यातही ... निव्वळ" नव-याबद्दलची तक्रार " असं यांच स्वरुप अजिबात नाही. मार्क्स हा कुठल्याही तत्वज्ञानाच्या पलिकडचा आहे. पण आताच्या समाजव्यवस्थेत प्रतिष्ठयेची, विचारांची सामाजिक बांधिलकी सांगणा-या कुणीही स्वत:च्या कर्तुत्वासाठी स्त्रीला चिरडता कामा नये. दुस-या अस्तित्वाला आकार देता येत नसेल, तर स्तब्ध राहणं चांगल; पण आपलं पौरुष सिध्द करण्यासाठी स्त्रीचा बळी देणं हे कुठल्याही समाज व्यवस्थेनं कधीही स्वीकारता कामा नये."[१७] असा स्पष्टपणे मांडलेला हा विचार आजच्या स्त्रीवादी समीक्षेचा कणा आहे. कारण आज अलिप्तपणे पाहिल्यास हेच स्पष्ठ होते की आज स्त्रीचा दर्जा काय? समाजातील स्त्रीचं खरं स्थान काय.? तिला स्वत:ला तरी या परिस्थितीचा जाणीव होते काय ? तिचं असंच बळी जाणं हे आपल्या विवेक बुध्दीला पटत काय ? याचा विचार करता आज खरोखरच स्त्री मुक्ती झालेली नाही. असेच म्हणावे लागेल. पुरुषाशिवाय स्त्रीला व्यक्ती म्हणून काही महत्व आहे. माणसासारखं जगणं ही स्त्रीची भूक आहे, आणि गृहिणी म्हणून मानलेल्या परंपरेला नकार देणे म्हणजेच घर, लग्न, आई होणे याबरोबरच तिच करिअरही महत्वाचं वाटणं. घर हे दोघांचे समजणं, विवाहातील वास्तवता समजून घेणे, आईपणा टिकवण्याचा अवास्तवा आग्रह आणि स्वत:ची आयडेंटीटी टिकवून दोघानीही एकरुप होणे अशा कांही मुलभूत गोष्टी स्त्रीवादाच्या आग्रही

SHIVAJI UNIVERSITY
LIBRARY
KOLHAPUR

स्वस्मात पुढे आल्या, ज्यामुळे स्त्रीया धिटपणे लिहू लागल्या. मला उद्ध्वस्त व्हायचयं हा असाच एका स्त्रीच्या आयडेंटीटी चा शोध आहे. पुरुषासारखे विचार स्त्रीच्या ठिकाणी असतात. तिला जसं शरीर आहे तसेच मनही असते. याचा विचार होऊ लागला. केवळ बाई असणे म्हणजेच स्त्रीवादी असणे नव्हे. त्यात जाणीव जागृती महत्वाची आहे. स्त्री म्हणून स्त्रीचे कांही अनुभव आहेत. याचा विचार स्त्रीवादाच्या दृष्टीने महत्वाचा त्या दृष्टीने हे आत्मकथन उल्लेखनीय ठरते. स्त्री वादामध्ये स्त्रीच्या शरीर अनुभवासकट व्यक्त होण्याला फार महत्व आहे. याचा प्रत्यय या आत्मकथनातून स्पष्टपणे येतो.

" स्त्री " जेव्हा स्वत:च्या अनुभवाकडे पाहत असते. तेंव्हा तिचा पुरुषापेक्षा भिन्न दृष्टिकोन असतो. तिचे कौमार्य, विवाहसंबंध, मातृत्व, अपत्यं संगोपन यात ती साक्षात गुंतलेली असल्याने याचे बरे वाईट परिणाम ती स्वत: सोसत असते हे तेंव्हा पुरुष जसे या अनुभवाकडे अंतरावरुन पाहतात तसे तिला शक्यच नसते. यामुळे जीवनातील कांही अनुभव खास बाईचेच असतात. आणि असे खास तिचे अनुभव समर्थपणे व अस्सलतेने व्यक्त केले आहे. यामध्ये तिच्या प्रसुती वेळचा अनुभव हा तिच्या जाणिवेच्या दृष्टीने महत्वाचा वाटतो. - " मला कळा सहन होईनात. एक कळ सर्वांग पेटवणारी... कंबर चरकातून पिळून काढतायत, असं वाटायचं... नं एकदम झापड यायची झोपेची... काढ गुंगी न् पुन्हा तीच जीवघेणी कळ... मी ठो - ठो ओरडू लागले... आजूबाजूला वेळ जवळ आलेल्या बायका होत्याच. त्या निर्विकारपणे आपापल्या सुटकेची वाट पहात होत्या. आया अचकट-विचकट बोलायच्या. बाप, रे - त्याही अवस्थेत त्या बायांना तोफेच्या तोंडी द्यावंसं वाटलं. बायकाच बायकांच्या दु:खाची टिंगल करत होत्या, कुत्सितपणे हसत-खिदळत होत्या.

" आता रडताय... आत घेताना कसं वाटलं असंल ? " वगैरे फक्त वेदना आणि वेदनाच....

घसा सुकला... कळा वाढू लागल्या. कपडयांचं भान नव्हतं... ए शरीर.... वेदना.... तसा त्रास थोडा वेळच झाला. साडेआठ ते साडेनऊ- एकच तास। पण तो एक तास वेदनांचं भयावह युग।

शेवटी वेळ आली. चार-पाच नर्सेस हत्यारं घेत पुढं सरसावल्या. मेलं कोंबडं आगीला भीत नाही, तसं मला वाटलं.

काय वाटेल ते करा, पणं या कळा थांबवा...

" हां... कर जो... ए, झोपू नको... झोपतेस काय ? "

वेदनेनं तळमळत मी अर्धवट जागी... थकलेले... चरकातून पिळून निघालेलं शरीर... पडणारच होते स्ट्रेचरवरुन खाली. एका नर्सनं सावरलं. त्या वैतागलेल्या... वॉर्डबॉय येत - जात वगैरे होते. पण शरीराची लाज वाटण्यापलीकडे जिवाचे हाल झालेले... उघडया पडलेल्या मांडया ... पोट-या... स्त्रीच्या आयुष्याच सार्थक विर्थक करणारा हाच का तो क्षण ? छे। त्यांनी माझे पाय गुडघ्यांत दुमडले दाबून धरले... कटकन. कापलं.... असंख्य वेदनांच्या आवर्तात आणखी एक तरंग... न सुळकन जीव बाहेर आला. तिने टबमध्ये ठेवला, न मला दाखवला.... लाल, लाल, कोवळा मांसाचा गोळा... बेंबीला चिकटून राहिलेली नाळ, लागून राहयलेलं रक्त... मी एकच क्षण पाहयलं...." निर्मितीचा हा क्षण किती वेदनामय पण मातृत्वाच्या या - " शारीरिक वेदनेचे दु:ख सगळ्यात वाईट,... कुणाला वाटता येत नाही. आपणच भोगायच असतं.... एकटयानंच.... आणि वेदनेनं ठणकणारं शरीर ठेचली जाणारी एकएक पेशी तुमच्या अवघ्या आत्म्याला दुबळ करते. फक्त वेदना आणि वेदनाच होती. त्या जगात लज्जा, संकोच या भावनाच नष्ट होत होत्या." [१८] यामुळेच ती पुन्हा येथे यायचं नाही. म्हणजे नंतरच्या मातृत्वाला नकार द्यायचा निर्णय घेते. या जगातल्या दाहकतेचा अनुभव मांडताना मलिका म्हणते " या जागी बायका पुन्हा पुन्हा मरण भोगायला येतात ? अंगावर सरसरून काटा आला... वंशाचा दिवा.... मातृत्वाची

आस... आई होण्यातलं अपूर्व समाधान... छी केवळ या शब्दांची दापणं पुरुषानं बहाल केली, म्हणून काय तिनं ती स्वीकारायची ? या वेदना सहन करण्यात तिला कोणत सुख मिळत असेल ? नसलेल्या भविष्याचं गाजर दाखवून कोण तिला नेतंय या अनोळखी, दिशाहीन अंधारवाटांवरनं ? मी ते यातनांच जग बघून भयभीत झालेले... सुस्कारे... कण्हणं.. म्लून चेहरे सा-या बायकांचे ... न ती कोरी शांतता... तेच ते वास.... तेच ते वातावरण.... जन्म आणि मरण. तिथं एवढंच घडू शकत होतं. पण तो जन्म नवीन असण्याचा आनंद नव्हता. जन्माबद्दल न मृत्यूबद्दल असहाय निर्विकारता अलिप्त ... तटस्थ कोरडं ... मी लेबररूममध्येच निर्णय घेतला. पुन्हा या जागी यायचं नाही."[१९] हा विचार या परंपरेलाच धिक्कारणारा आहे की ज्या परंपरेत दु:खाचे सारेच गाठोडे केवळ स्त्रीवर लादले ती परंपरा एक पुरुषी पणाच्या स्वार्थी राजकारणातून आल्याने त्याचा ती धिक्कार करते. एकूणच तिच्या वाटयाला आलेल्या दु:खाचा जेंव्हा विचार करतो तेंव्हा स्त्रीच्या शोषणाचा जो विचार स्त्रीवादामध्ये आहे त्या दृष्टीने हे सर्व अनुभव विचारात घ्यावे लागतात.

स्त्रीचं स्वतंत्र व्यक्तिमत्व म्हणजे काय ? हे सांगताना मलिका म्हणते " ज्या स्त्रीला कुठं थांबायचं हे कळतं, तिला स्वतंत्र प्रज्ञेची समजावं" [२०] इथे माणूसपणाचं अवधान ठेवून स्वातंत्र्याचा अट्टाहास करणे हे मलिकेला अभिप्रेत असलेले स्त्री स्वातंत्र्य दिसते. जस पुरुषाला मोह असतो. तसे मोहाचे क्षण आमच्याही आयुष्यात येत नाहीत का ? असा प्रश्न तिला विचारावा वाटतो.

मलिका अमरशेख यांचे हे आत्मकथन एका पुरुषी व्यवस्थेविरुध्दचा लढा आहे. तो लढा एका विशिष्ट व्यक्ती विरुध्द नाही. तर प्रवृत्ती विरुध्द आहे. आणि ही प्रवृत्ती एका विशिष्ट टोकाला येण्याने होणारी स्त्रीची कुचंबना त्यातून स्वत:ला व्यक्त करण्याचा झालेला प्रयत्न पण शेवटी अपयशी ठरलेल्या हतबल झालेल्या एका स्त्रीचे ते निवेदन आहे असे वाटते.

स्त्री कितीही शिकली, स्वत:च्या पायावर उभी राहण्या इतपत समर्थ झाली, " स्वतंत्र " तेचा विचार करु लागली तरी तिच्या प्रकृती आणि पुरुषामुळे येणा-या बंधनातून ती पूर्णपणे मुक्त झाली असे आजतरी दिसत नाही. आपण पुरुषासारखं स्वतंत्र, समर्थ जीवन जगू शकतो असे मलिकेला वाटूनही या व्यवस्थेमुळे जगता येत नाही. यातूनच ऐकेकाळी मनसोक्त आयुष्य जगणारी स्त्री स्वत:ला उद्ध्वस्त, नष्ट करायला निघाली आहे. यातून स्त्रीवर परंपरेची, समाजाची, पुरुषाची व्यवस्थेची कौटुंबिक शारीरिक बंधने किती मजबूत जखडलेली आहेत. यातून निसटताना मुक्त होवून बाहेर पडताना तिला किती व्यथा वेदना होतात. याचे दाहक चित्रण मलिकेने " मला उद्ध्वस्त व्हायचयं " या आत्मकथनामध्ये केलेले आहे. इतके करुनही ती फक्त एका पुरुषापासून मुक्त होते. पण ते मुक्त होतं तिला स्वतंत्र, समर्थ करण्याऐवजी उद्ध्वस्त करण्याकडे घेऊन जाते. हा एका प्रातिनिधीक स्त्री जीवनाचा अविष्कार आहे. एकूणच पुरुष प्रधान व्यवस्थेमध्ये स्त्रीला जे भोगावे लागते, स्त्री म्हणून जे सहन करावे लागते याचा अतिशय बिनधास्तपणे मलिका अमरशेखी वेध घेतलेला आहे. यातून स्त्रीजीवनासंबंधी कांही मूलभूत प्रश्न समोर येतात. त्यामध्ये पुरुषी व्यवस्थेतील स्त्रियांचे असणारे स्थान तिचे स्वातंत्र्य याबद्दल विचार व्यक्त करताना त्या म्हणतात - " पण खरोखर बायकांना न्याय कुणी द्यावा ? तिची बाजू कळल्याशिवाय तिचे हक्क, तिचं स्वातंत्र्य एका बाजूला न मानता पुरुष तिला कोणत्या निकषावर न्याय देवू शकतो ? " [२१] पुरुषाला पूर्ण स्वातंत्र्य उपभोगावयास मिळते पण स्त्रीला मात्र पारतंत्र्य इथे पुरुषप्रधान समाज व्यवस्थेमुळे स्त्रीच्या मनांची झालेली घुसमट व्यक्त होते. स्त्रीला माणूस म्हणून पाहण्याची वृत्ती पुरुषात नाही त्यामुळे ती कशी दुर्लक्षीली गेली आहे. याचे दु:ख लेखिका मांडतात. स्त्रीयांकडे पाहण्याचा पुरुषाचा भोगवादी दृष्टिकोन त्यामुळे स्त्रीला या समाज व्यवस्थेत स्थानच नाही. त्यामुळे लेखिका म्हणतात -
" आजच्या समाजव्यवस्थेत स्त्रीचं खरं स्थान कुठं आहे ? तिला या समळ्या परिस्थितीची जाणीव होते आहे का ? या सगळ्यावर उपाय काय ? कबूल. हे सगळेच अत्यंत खाजगी प्रश्न आहेत. त्यात कुणी लक्ष घालू इच्छीत नाही.

पण आपल्यावरच्या अन्यायाचा प्रतिकार म्हणून स्त्रीच्या हातात काय हत्यार आहे ? तिनं असंच बळी जायचं ? परंपरा तुटल्यात फक्त पुरुषां-पुरत्या.... माझं रडगाणं ऐकवण्यात मला काय मिळालं. याची बेरीज-वजाबाकी मी करणार नाही. "[२२] यातून या समाज व्यवस्थेतील स्त्री परवशता दु:खं त्या व्यक्त करून स्त्री जागृतीचा प्रयत्न केला आहे.

स्त्री स्वातंत्र्याचा पुरस्कार करतांना त्या म्हणतात – " मी अनेक वेळा स्वत:ला जोखून पाहयलं.... मी स्वत:ला अत्यंत खालच्या पातळीवर ओढत नेलं... फरफटत नेलं अवघ्या आयुष्याला... हे डाचतं... मी स्वाभिमानी होते. पूर्ण स्त्री-स्वातंत्र्याची पुरस्कर्ती म्हणण्यापेक्षा माझं काय किंवा कुठ ल्याही स्त्रीचं अस्तित्व हे जन्मत: स्वतंत्र असतंच न ते तिनं कुठल्याही किंमतीवर टिकवायला पाहिजे, या मताची मी होते, आहे. जोपर्यंत स्त्री नवरा-संसार या गोष्टींना सर्वस्व मानून आपल्या व्यक्तित्वाची होळी करून टाकते, तोवर तिला समाजात गौण स्थान मिळणारच. पुरुष काय किंवा कुणीही स्वत:ची सत्ता सोडायला कोण तयार होतं, सहजासहजी ? शेवटी पुरुषांचा ईगो आम्ही बायकाच जोपासतो ना ? प्रतारणा स्त्रीनं कधीही सहन करु नये. तो तिचा सर्वात मोठा अपमान, का म्हणून ? शारीरिक भूक काय स्त्रीचीच गरज असते ? जो नवरा आपल्या बायको कडून एकनिष्ठ प्रेमाची अपेक्षा ठेवतो, त्यानं सुध्दा तीच कसोटी स्वत:ला लावायला नको काय ? लग्नाशिवाय बाहेर लफडं ही गोष्ट कॉमन आहे, असं म्हणून सगळेच हा विषय झटकून टाकतात. कारण पुरुषांचंच राज्य. त्यांच्या फायद्याचं, ते समर्थन करणारच. पण स्त्रियांचा विचार ही केला न आळीमिळी गूपचिळी – " पुरुष असाच असतो. शेवटी घरंरच येणार ना " एवढ म्हणून गृहच्छिद्र बाहेर कशाला दाखवायची, या विचारानं गप्प बसतात. हे गप्प बसणंच वाईट असतं.... आपण जेवढं सहन करतो तेवढंच आपल्या डोक्यावरच्या

अन्यायाचं ओझं जास्त जास्त मोठं होत जाणार. " २३ या समाज व्यवस्थेत स्त्रीला स्वातंत्र्य हे पुरुषाकडून मिळणारच नाही. तेंव्हा आपण स्वकर्तृत्ववान होवून हे स्वातंत्र्य मिळविले पाहिजे हे सांगून पुरुषाच्या गोष्टी पोटात घालून क्षमाशील वृत्ती दाखवण्यापेक्षा जाब विचारण्याचा प्रयत्न स्त्रीने केला. स्त्रीवादाने आणखि एक वैशिष्टय आहे. स्वत:चा उध्दारकर्ता स्वत:लाच बनले पाहिजे. कारण मुळात स्त्रीमुक्ती चळवळ ही गोष्ट फक्त स्त्रीयानीच स्त्रियांसाठी कांही तरी करायची गोष्ट आहे असे इथले यच्ययावत प्रोग्रेसिव्ह पुरुष समजतात..... शिवाय वेगळी मेंदू वेगळा विचार करण्याची ताकद असताना स्त्रीन पुरुषी वर्चस्व का स्वीकाराव हा स्वत:ला मिटवून १ हा लेखीकेचा प्रश्न स्त्रीमुक्तीच्या दृष्टिण " २४ सबंध स्त्रीयाना उददेशून आहे. असेच यातून स्पष्ट होते. हेच आजच्या स्त्रीवादाचे एक मोठे गृहितक आहे.

मलिका अमरशेख, तिने पाहिलेली तारुण्यातील स्वप्ने, वैवाहिक जीवनातील तिचे अनुभव, मातृत्व भावनेचा आविष्कार आणि या सर्व अवस्थेत तिच्या जीवनावरील पतीचे असलेले पूर्णपणे वर्चस्व या सर्वस्वामुळे झालेले तिच्या भावजीवनाचे उद्ध्वस्तीकरण पुरुषी अहंकाराचा, पुरुषी वर्चस्वाचा आणि स्वामित्व भावनेचा जो अनुभव तिला आला. त्यामुळे प्रत्येक अवस्थेत तिच्या " स्त्रीत्वा " ला धक्का बसला आणि एकूणच समाज व्यवस्थेतील स्त्रीचे स्थान स्पष्ट झाले. बंड करु पहाणारे मन, मुक्त होवू पहाणारी स्त्री - बंड करु शकत नाही. यातनाकांडातून मुक्तही होवू शकत नाही. पण जे आहे ते निर्भयपणे स्विकारण्याच्या उर्मिने आणि एकूणच स्त्रीवादीच्या कळवळ्याने मांडणे हे स्त्री वादाच्या संकल्पनेत निश्चितपणे येणारे आहे.

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR

## संदर्भ सूची


१) मलिका अमरशेख ... मला उद्ध्वस्त व्हायचयं पृ.क्र. २७

२) कित्ता ... पृ. क्र. ५६

३) कित्ता ... पृ. क्र. ६७

४) कित्ता ... पृ. क्र. ६८

५) कित्ता ... पृ. क्र. ६९

६) कित्ता ... पृ. क्र. ७५

७) कित्ता ... पृ. क्र. ८४

८) कित्ता ... पृ. क्र. ८५

९) कित्ता ... पृ. क्र. ७९

१०) कित्ता ... पृ. क्र. ९३

११) कित्ता ... पृ. क्र. ९५

१२) कित्ता ... पृ. क्र. ९५

१३) कित्ता ... पृ. क्र. १०२

१४) कित्ता ... पृ. क्र. १०७

१५) कित्ता ... पृ. क्र. १०८

१६) कित्ता ... पृ. क्र. १११

१७) कित्ता ... पृ. क्र. ११०

१८) कित्ता ... पृ. क्र. ६१

१९) कित्ता ... पृ. क्र. ६४

२०) कित्ता ... पृ. क्र. १०९

२१) कित्ता ... पृ. क्र. ११९

२२) कित्ता ... पृ. क्र. ११९

२३) कित्ता ... पृ. क्र. १२३

२४) कित्ता ... पृ. क्र. ९६


.....